■ दैनिक ■ धाराशिव ■ वर्ष 2 रे ■ अंक 55 ■ बुधवार, 02 एप्रिल 2025 ■ RNI NO.-2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रू. 5

दैनिक आरंभ मराठी

arambhmarathi535@gmail.com

## कडबा आणि सोयाबीनची गुळी जाळून नुकसान

**आरंभ मराठी । उमरगा**

आरोपीव्यंकट गोविंद सुगावे (रा. माडज ता. उमरगा) यांनी दिनांक ३० मार्च रोजी रात्री साडे अकरा वाजता माडज येथे फिर्यादी प्रदिप गोविंद सुगावे (वय ३० वर्षे, रा. माडज) यांच्या प्लॉटच्या मोकळ्या जागेतील १० ट्रॅक्टर सोयाबीनची गुळी व ५०० पेंड्या ज्वारीचा कडबा हे आग लावुन जाळून प्रदिप सुगावे यांचे २०,००० रुपयांचे नुकसान केले. प्रदिप सुगावे यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन उमरगा पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३२६ (एफ) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## वागदरी येथे चोरी; ८४००० रुपये किंमतीचा मुद्देमाल लंपास

**आरंभ मराठी । तुळजापूर**

तुळजापूर तालुक्यातील वागदरी येथे रात्रीच्या वेळी चोरी करून ८४००० रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरून नेला. फिर्यादी शरद धरम पवार (वय ४५ वर्षे, रा. वागदरी ता. तुळजापूर) हे उन्हाळा असल्याने वरंड्याचे दार उघडे ठेवून झोपले होते. दिनांक ३० मार्च रोजी रात्री अज्ञात व्यक्तीने घरातुन १५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम २,००० असा एकुण ६५,००० रुपयांचा माल व त्यांच्या शेजारी राहणारे रविकांत यादव यांचा मोबाईल फोन असा उकुण ८४,००० रुपये किंमतीचा माल चोरुन नेला.

# कळंब येथील महिलेच्या हत्येचे गूढ उलगडले; दोन आरोपी ताब्यात

## संतोष देशमुख प्रकरणाशी संबंध आहे का, तपास सुरू




(आरोपी) उस्मान सय्यद, रामेश्वर भोसले

**आरंभ मराठी । कळंब**

**मनीषा बिडवे-कारभारी ही ४५ वर्षांची महिला कळंब शहरातील द्वारका नगरी वसाहतीत राहत होती. २७ तारखेला तिच्या राहत्या घरात सडलेल्या अवस्थेत तिचा मृतदेह आढळला होता. त्यामुळे या मृत्यूबाबत वेगवेगळे तर्क वितर्क लावले जात होते. काल या हत्येतील मुख्य दोन आरोपींना पोलिसांनी पकडल्यानंतर या हत्येचा संबंध संतोष देशमुख हत्ये प्रकरणाशी आहे का याचा शोध पोलिसांकडून घेतला जात आहे. पोलिसांनी संतोष देशमुख प्रकरणाशी महिलेचा संबंध नसल्याचे स्पष्ट केले असले तरी पोलिसांचा तपास मात्र त्याच दिशेने सुरू असल्याचे समजते.**



मनीषा बिडवे-कारभारी (मयत)

सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी कळंबची मृत महिला ही संतोष देशमुख यांना खोट्या गुन्ह्यात अडकवण्यासाठी तयार करण्यात आलेली महिला असून तिचा संशयास्पद मृत्यू झाल्याची शंका उपस्थित केली होती. त्यामुळे या प्रकरणाला वेगळे वळण मिळाले होते. मात्र पोलिसांनी या महिलेचा संतोष देशमुख प्रकरणाशी सबंध नसल्याचे स्पष्ट केले आहे. दरम्यान, पोलिसांना घटनास्थळी मिळालेले पुरावे, फोन कॉल्स याच्या माध्यमाने पोलिसांनी आपला तपास सुरू ठेवला होता. द्वारका नगरीतील मनीषा बिडवे-कारभारी हिचे मारेकरी अखेर पोलिसांना सापडले आहेत. रामेश्वर भोसले आणि उस्मान सय्यद या दोन आरोपींना अटक केली आहे. उस्मान सय्यद याला संशयित म्हणून तीन दिवसांपूर्वी पोलिसांनी केज येथून ताब्यात घेतले होते. तर मुख्य आरोपी रामेश्वर उर्फ रामा भोसले ज्याने प्रत्यक्षात खून केला तो पोलिसांना गुंगारा देत होता. आळंदी, पुणे, मिरज, गोवा, कर्नाटक या ठिकाणी तो फिरत होता. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गोपीनिय माहिती मिळाली की, तो येरमाळा येथे आलेला आहे. सापळा रचून मिळालेल्या पुराव्यांच्या आधारे सुरुवातीला एलसीबीच्या पोलिसांनी उस्मानला ताब्यात घेतले. त्यानंतर तपासाचा धागा पकडत मुख्य आरोपी रामेश्वर भोसले याला देखील अटक केली. पोलीस पुढील तपास करीत आहेत. स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक पोलिस निरीक्षक सुदर्शन कासार, पोलीस हवालदार शौकत पठाण, प्रकाश औताडे, फरहानखान पठाण, जावेद काझी या पोलीस पथकाने आरोपींना पकडण्यात महत्वाची भूमिका पार पाडली.



### मृतदेहासह आरोपी दोन दिवस राहिला

रामेश्वर भोसले नावाचा तरुण मनीषा बिडवे हिच्याकडे मागील काही महिन्यांपासून काम करत होता. तो सुरुवातीला तिचा ड्राइव्हर होता. नंतर संबंधित महिलेसोबत त्याचे सबंध जुळले. कांही दिवसांनी ती महिला त्याला त्याचे नग्न फोटो आणि व्हिडीओ दाखवून मानसिक त्रास देऊ लागली. गुन्हा दाखल करायची धमकी देऊन त्याचा छळ करायला लागली. महिला दररोज रामेश्वरला मारहाण करून त्याचा शारीरिक छळ करत होती. घटनेच्या दिवशी म्हणजे २२ मार्च रोजी तिने त्याला १०० उठाबशा काढायला लावल्या होत्या. या सगळ्या त्रासातून त्याने तिच्या डोक्यात वार केला. या मारहाणीत तिचा मृत्यू झाला. इतकंच नाही तर संबंधित आरोपी दोन दिवस मृतदेह असलेल्या घरात राहिला. तो जेवण ही तिथेच करायचा. तिसऱ्या दिवशी वास येऊ लागल्याने आरोपीने गाडी घेऊन पोबारा केला. केज येथील आपल्या उस्मान सय्यद नामक मित्राला घटनेच्या ठिकाणी द्वारका नगरी येथे आणून मृतदेह दाखवला. दोघेही सुरुवातीला पुरावे नष्ट करायला आल्याचे समजते.

### संतोष देशमुख प्रकरणाशी संबंध नाही

या गुन्ह्यामध्ये सध्या रामेश्वर भोसले आणि उस्मान सय्यद असे दोन आरोपी ताब्यात घेतलेले असून, त्यांची चौकशी सुरु आहे. सध्यातरी संतोष देशमुख प्रकरणाशी या हत्येचा संबंध असल्याचा कोणताही पुरावा उपलब्ध नाही. त्यामुळे त्या प्रकरणाशी महिलेचा संबंध असल्याचे ठामपणे सांगता येत नाही.

**-रवी सानप,**
**पोलीस निरीक्षक, कळंब.**

## गोलेगाव येथे घरफोडी; पावणे तीन लाखांचा मुद्देमाल लंपास

**आरंभ मराठी । वाशी**

वाशी तालुक्यातील गोलेगाव शिवारात दोन संशयित चोरट्यानी घरफोडी करत घरातील सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम अशी एकूण पावणे तीन लाखांचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना घडली. यासंबधी सविस्तर वृत्त असे की,फिर्यादी मालनबाई मुरलीधर उंदरे (वय ६५ वर्षे, रा. गोलेगाव) यांच्या गोलेगाव ते धाराशिव जाणाऱ्या हायवे रोडलगत गोलेगाव शिवारातील घरातील अंदाजे १,७५,००० किंमतीचे २५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, रोख रक्कम १,००,००० रुपये हे दिनांक १९ मार्च ते २१ मार्च दरम्यान संशयीत आरोपी नवनाथ कदम (रा. खानापुर ता. वाशी) आणि अमोल खरोसे यांनी चोरुन नेले. मालनाबाई उंदरे यांनी ३१ मार्च रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन वाशी पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## अवैध मद्य विरोधी १७ छापे; चारशे लिटर गावठी दारू जप्त

**आरंभ मराठी । धाराशिव**

अवैध मद्य विरोधी धाराशिव जिल्ह्यात १७ छापे टाकण्यात आले. यामध्ये चारशे लिटरपेक्षा अधिक गावठी दारू जप्त करण्यात आली. पोलीस अधीक्षक संजय जाधव, अपर पोलीस अधीक्षक शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवारी (दि.३१) धाराशिव जिल्ह्यात अवैध मद्य विरोधी १७ कारवाया करण्यात आल्या. या छाप्यात घटनास्थळावर आढळलेले सुमारे ४०५ लिटर गावठी दारु, २३ लिटर सिंधी ताडी अम्ली द्रव व देशी विदेशी दारुच्या १११ सिलबंद बाटल्याअसे मद्य जप्त करण्यात आले. जप्त करण्यात आलेल्या मद्याची एकत्रीत किंमत अंदाजे ४३,९३० आहे. यावरुन महाराष्ट्र मद्य मनाई कायद्यांतर्गत आंबी पोलीस ठाण्यात ३, ढोकी पोलीस ठाण्यात ६, लोहारा पोलीस ठाण्यात ५ आणि तुळजापूर, येरमाळा व धाराशिव शहर या पोलीस ठाण्यात प्रत्येकी एक असे एकूण १७ गुन्हे नोंदवण्यात आले.

## विविध मागण्यांसाठी १४ वीज कंत्राटी कामगारांचे महावितरणसमोर उपोषण

### एजन्सी मार्फत नियुक्ती न दिल्यामुळे आंदोलन

**आरंभ मराठी । धाराशिव**

धाराशिव जिल्ह्यातील कंत्राटी वीज कामगारांनी त्यांच्या विविध मागण्यांसाठी आंदोलनाचे हत्यार उपसले असून, यातील १४ कामगार हे धाराशिव शहरात आमरण उपोषणाला बसले आहेत. धाराशिव परिमंडळा अंतर्गत जुन्या व अनुभवी तसेच कोरोना काळात काम केलेल्या कंत्राटी कामगारांना डावलून एजन्सी कडून नवीन मुलांना कामावर घेतले जात असल्याचा आरोप कंत्राटी वीज कामगार संघाने केला आहे. धाराशिव जिल्ह्यातील ७७ कंत्राटी कामगारांना बांद्रा येथील लेबर कोर्टाने दिलासा देऊनही एजन्सी कडून कोर्टाचा आदेश पाळला जात नसल्याचा आरोप केला आहे. डावललेल्या कंत्राटी कामगारांना एजन्सी कडून नियुक्ती देण्यासाठी यापूर्वी निवेदन देऊनही त्याची दखल घेतली नसल्याचा आरोप कंत्राटी कामगार संघाने केला आहे. लेबर कोर्टाकडून ७७ जणांना पुन्हा कामावर घेण्याचा आदेश देऊनही यातील २२ कंत्राटी कामगारांना एजन्सीने नियुक्ती दिली नाही. तसेच नियुक्ती देण्यासाठी एजन्सी मार्फत पैशांची मागणी केली जात असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. जोपर्यंत कंत्राटी कामगारांना न्याय मिळत नाही तोपर्यंत आमरण उपोषण केले जाईल असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे.




### नियुक्तीसाठी एजन्सीकडून पैशांची मागणी

कंत्राटी कामगारांना पुन्हा नियुक्ती देण्यासाठी एजन्सीकडून वारंवार पैसे मागितले जातात असा आरोप कंत्राटी कामगारांनी केला आहे. कंत्राटी कामगारांना महिन्याला १८००० वेतन दिले जाते. त्या वेतनातील दर महिन्याला २००० रुपये एजन्सीला द्यावे लागतात असे काही तरुणांनी सांगितले. तसेच नियुक्ती देताना एकरकमी १५००० रुपये एजन्सी मागते असाही आरोप केला जात आहे. धाराशिव जिल्ह्यात ४०० कंत्राटी कामगार असून या सर्वांकडून पैसे मागितले जात असल्याचा आरोप कामगारांनी केला आहे. याच प्रश्नावर आमदार कैलास पाटील यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात आवाज उठवला होता.

## पहिल्याच प्रयत्नात यशाला गवसणी; सोनेगावच्या योगेश मोरे यांची न्यायाधीशपदी निवड

**आरंभ मराठी । धाराशिव**

धाराशिव तालुक्यातील सोनेगाव गावात लहानाचे मोठे झालेले योगेश लक्ष्मण मोरे यांनी स्पर्धा परीक्षेतून यशस्वी होत न्यायाधीश परीक्षा उत्तीर्ण केली आहे. वकीली क्षेत्रात त्यांना आवड असल्यामुळे त्यांनी वकिलीचा पदवी प्राप्त करून काही काळ वकिली केली आहे. मागील वर्षी त्यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून न्यायाधीश पदाची परीक्षा दिली होती. या परीक्षेत पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा आणि मुलाखत या तिन्ही टप्प्यावर यश मिळवत त्यांनी महाराष्ट्र राज्यातून ६० व्या क्रमांकावर उत्तीर्ण होत गुणवत्ता यादीत यश मिळवले. त्यांचे वडील शिक्षक असल्यामुळे त्यांना शिक्षणाची लहानपणापासून आवड होती. योगेश मोरे यांनी २०२२ मध्ये निघालेल्या न्यायाधीश पद भरतीचा फॉर्म भरला. २०२३ मध्ये प्री एक्झाम झाली. २०२४ मध्ये ऑगस्ट महिन्यात मेन एक्झाम पास आऊट होऊन २० मार्च २०२५ रोजी इंटरव्यू पूर्ण झाला. नुकताच न्यायाधीश पदभरतीचा निकाल लागला आणि योगेश आणि आई-वडिलांचा आनंद गगनात मावेनासा झाला. ग्रामीण भागातून येऊन, उच्च शिक्षण घेऊन मोठ्या पदाला गवसणी घातली म्हणून सर्व स्तरातून योगेशचे कौतुक केले जात आहे.



# ई केवायसीसाठी आणखी एक महिन्याची मुदतवाढ




### जिल्ह्यात ७० टक्के लाभार्थ्यांची ई केवायसी पूर्ण

**आरंभ मराठी । धाराशिव**

रेशन लाभधारकांना ई केवायसी करण्यासाठी आणखी एक महिन्याची मुदतवाढ देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. रेशन दुकानवर मिळणाऱ्या धान्याचा काळा बाजार होवू नये, यासाठी सर्वच धान्य उचलणाऱ्या लाभार्थ्यांचे आधार सिडिंग यापूर्वीच करण्यात आले आहे. तसेच रेशनचे धान्य पॉस मशिनवर वितरित करण्यात येते. त्यासाठी ई केवायसी आवश्यक असल्याने मार्चअखेर ई केवायसी पूर्ण करण्याचे उद्दीष्ट पुरवठा विभागाला देण्यात आले होते. त्यासाठी वारंवार पाठपुरावा करुन जिल्हा पुरवठा विभागाच्या वतीने आतापर्यंत ७० टक्के लाभार्थ्यांची ईकेवायसी पूर्ण करण्यात आली आहे. तरीही अनेक लोकांनी त्याकडे दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे शासनाच्या वतीने ई केवायसीसाठी आता ३१ मार्च या दिलेल्या मुदतीला एक महिना मुदतवाढ देऊन ३० एप्रिलपर्यंत केवायसी पूर्ण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. धाराशिव जिल्ह्यातील आठ तालुक्यातील ११ लाख ८८ हजार ६९६ लोकांची आधार सिडिंग करण्यात आली होती. त्यापैकी ६ लाख ६६ हजार ४१ जणांची केवायसी मान्य करण्यात आलेली आहे. तर आणखी ३ लाख ६२ हजार ८९४ जणांनी आणखी ईकेवायसी पूर्ण केलेली नाही. त्या लोकांना आता ३० एप्रिलपूर्वी केवायसी करावी लागेल. त्यासाठी शासनाच्या वतीने एक महिन्यासाठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. यापुढे मुदतवाढ मिळेल अथवा नाही याची साशंकता असल्याने राहिलेल्या लोकांनी तातडीने केवायसी पूर्ण करुन घ्यावी, रेशनचे धान्य मिळविण्यासाठी ई केवायसी अत्यावश्यक करण्यात आले आहे. ज्या ज्या लोकांची केवायसी पूर्ण आहे. त्याच लोकांना पॉस मशिनवर धान्य उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्यासाठी रेशन दुकानात अथवा ईसेवा केंद्र अथवा आपले सेवा केंद्रावर जावून ई केवायसी पूर्ण करणे आवश्यक आहे. अन्यथा भविष्यात त्यांना रेशनवर मिळणाऱ्या धान्याला मुकावे लागणार आहे.

### लाभार्थ्यांनी ई केवायसी करून घ्यावी

यापूर्वी स्वस्त धान्य दुकानात जाऊन ई-केवायसी करावी लागत होती. मात्र, तांत्रिक अडचणींमुळे नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत होते. यावर उपाय म्हणून सरकारने 'मेरा ई-केवायसी' ॲप विकसित केले आहे, त्यावर ई केवायसी करणे सोपे आहे. ई-केवायसी पूर्ण केल्याशिवाय धान्याचा लाभ घेता येणार नाही. अपात्र लाभार्थ्यांना आळा घालण्यासाठी आणि फसवणूक रोखण्यासाठी ई-केवायसी बंधनकारक करण्यात आले आहे. एक महिन्याच्या मुदतीत राहिलेल्या लाभार्थ्यांनी केवायसी करून घ्यावी.

**-मृणाल जाधव**
**तहसीलदार.**

### प्रलंबित केवायसी आकडेवारी

| तालुका | झालेली केवायसी (%) | राहिलेली केवायसी |
|---|---|---|
| वाशी | ७४% | १८५२० |
| कळंब | ७४% | ४२९१५ |
| परंडा | ६७% | ३८७१९ |
| लोहारा | ६५% | ३०७९६ |
| भूम | ७१% | ३०५२२ |
| धाराशिव | ७०% | ८२८१२ |
| तुळजापूर | ६७% | ५७१९९ |
| उमरगा | ६६% | ६१४१२ |
| एकूण | ७०% | ३६२८९४ |

## विधानपरिषदेच्या उपसभापती प्रा.डॉ.नीलम गोऱ्हे उद्या धाराशिव दौऱ्यावर

**आरंभ मराठी । धाराशिव**

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उपसभापती प्रा.डॉ.नीलम गोऱ्हे ह्या उद्या गुरुवारी (दि.३) धाराशिव जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार आहेत. नीलम गोऱ्हे या सोलापूर येथून मोटारीने सकाळी ७.४५ वाजता तुळजापूरला येतील आणि आई तुळजाभवानी देवीजींचे दर्शन घेतील. सकाळी ८.३० वाजता तुळजापूर शासकीय विश्रामगृह येथे आगमन आणि सकाळी ९ वाजता तुळजापूर देवस्थानाबाबत शासकीय विश्रामगृह येथे बैठक घेतील. सकाळी १०.३० वाजता धाराशिवकडे प्रयाण करतील. सकाळी ११ वाजता धाराशिव शासकीय विश्रामगृह येथे त्यांचे आगमन होईल. सकाळी ११ : ३० वाजता शिवसेना पदाधिकाऱ्यांसमवेत त्या बैठक घेतील. दुपारी ३ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात भूकंपग्रस्त भागात सामाजिक वनीकरण, उन्हाळ्यात जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याचे नियोजन, जिल्ह्यात कायदा सुव्यवस्था आणि अमली पदार्थविरोधी कार्यक्रमाचा तसेच ऊसतोड महिला कामगार योजनेबाबतचा आढावा घेणार आहेत. सायंकाळी ५ : ३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात पत्रकार परिषद घेतील व सायंकाळी शासकीय वाहनाने लातूरकडे प्रयाण करतील.



## नेपाळमध्ये पुन्हा राजेशाहीचे वारे

नेपाळमधील नागरिक पुन्हा एकदा राजेशाही प्रस्थापित व्हावी यासाठी रस्त्यांवर उतरून आंदोलन करत आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या या आंदोलनाला आता हिंसक वळण लागले असून या आंदोलनादरम्यान झालेल्या हिंसाचारात दोन जणांचा जीवही गेला आहे. जगातील एकमेव हिंदू राष्ट्र असलेल्या नेपाळमध्ये सर्वाधिक काळ राजेशाही होती. नेपाळमध्ये जवळपास २४० वर्ष राजेशाही होती. १९९६ साली पहिल्यांदा नेपाळमधील डाव्या विचारांच्या माओवाद्यांनी राजेशाही विरुद्ध बंड पुकारले आणि देशात लोकशाही प्रस्थापित व्हावी यासाठी आंदोलन झाले. जगात सर्वत्र लोकशाहीचे वारे असताना नेपाळमध्ये लोकशाहीच असावी अशा विचाराने तरुणांनी देखील माओवाद्यांच्या या आंदोलनाला पाठिंबा दिला मात्र नेपाळमध्ये राजेशाहीची पाळेमुळे खोलवर रुतली असल्याने या आंदोलनाला लगेच यश मिळाले नाही. २००१ साली नेपाळमध्ये अशी घटना घडली ज्यामुळे राजेशाहीची पाळेमुळेच ध्वस्त झाली. २००१ मध्ये तत्कालीन राजमहालामध्ये नेपाळचे तत्कालीन राजे वीरेंद्र वीर विक्रम शहा आणि त्यांच्या संपूर्ण कुटुंबाची हत्या झाली. या हत्याकांडाने केवळ नेपाळच नाही तर संपूर्ण जग हादरून गेले. या हत्याकांडानंतर ज्ञानेंद्र शहा यांना नवे राजे म्हणून घोषित करण्यात आले. या हत्याकांडानंतर राजेशाही विरुद्ध लोकांच्या मनात चीड निर्माण झाली होती त्यातच २००५ मध्ये राजे ज्ञानेंद्र यांनी नेपाळची घटना रद्द करून टाकली आणि संसद ही बरखास्त केली त्यामुळे माओवादी आणखी चिडले व त्यांनी उग्र आंदोलने केली त्यांच्या या आंदोलनात लोकशाहीवादीही होते. माओवादी आणि लोकशाही वाद्यांनी राजेशाही विरुद्ध थेट यलगार पुकारला त्यामुळे २००८ साली २४० वर्षाची राजेशाही उखडून पडली आणि लोकशाही प्रस्थापित झाली. या आंदोलनात जवळपास १६ हजार नागरिकांचा जीव गेला. २००८ साली राजेशाही जाऊन लोकशाही प्रस्थापित झाल्यावर तेथील नागरिकांना वाटले की लोकशाही मार्गाने आता आपला देश प्रगती करेल. शेजारील भारताने जशी लोकशाही मार्गाने प्रगती केली तशीच प्रगती आपला देशही करेल पण नागरिकांची ही अपेक्षा फोल ठरली. कारण नेपाळमध्ये लोकशाही प्रस्थापित होऊन देखील नेपाळला स्थिर सरकार मिळू शकले नाही. २००८ ते आतापर्यंत म्हणजे सतरा वर्षात नेपाळमध्ये १४ सरकारे आली. त्यात पुष्लकमल दहल यांचे सरकार तीन वेळा तर के पी ओली शर्मा यांचे चार वेळा सरकार आले पण एकानेही स्थिर सरकार दिले नाही. या सरकारांच्या काळात नेपाळमध्ये भ्रष्टाचार प्रचंड वाढला. छोट्या छोट्या कामांसाठी नागरिकांना पैसे मोजावे लागत. भ्रष्टाचारामुळे या सरकार विरुद्ध जनतेत प्रचंड नाराजी निर्माण झाली हीच नाराजी हेरून राजे ज्ञानेंद्र यांनी फेब्रुवारी मध्ये एक निवेदन जरी केले या निवेदनात त्यांनी म्हटले की राष्ट्र आणि राष्ट्राचे ऐक्य वाचवण्यासाठी सर्वांनी एकत्र येण्याची वेळ आली आहे. राजे ज्ञानेंद यांच्या या निवेदनानंतर नेपाळमध्ये पुन्हा राजेशाही प्रस्थापित व्हावी असे वाटणारा वर्ग रस्त्यावर आला आणि त्यांनी पुन्हा राजेशाही प्रस्थापित व्हावी यासाठी आंदोलन केले. राजेशाही समर्थकांचे हे आंदोलन कुचलून टाकण्यासाठी तेथील सरकार सर्वोतोपरी प्रयत्न करत आहे. या आंदोलनांमुळे नेपाळमध्ये लगेच राजेशाही प्रस्थापित होईल असे नाही मात्र राजेशाही प्रस्थापित व्हावी असे वाटणारा जो वर्ग आहे त्यांना आशेचा किरण दिसला आहे. तो वर्ग यापुढे ही राजेशाही साठी रस्त्यावर उतरेल. नेपाळमध्ये राजेशाहीचे वारे पुन्हा वाहू लागले आहे हे नक्की.

# उष्णलहरी आणि उष्माघातापासून पशुधनाची काळजी घ्या

### पशुसंवर्धन विभागाचे पशुपालकांना आवाहन

**आरंभ मराठी । धाराशिव**

जागतिक तापमान वाढीच्या प्रभावामुळे उन्हाळ्यात तापमान वाढत आहे, ज्यामुळे मानवासोबतच पशुधनालाही त्रास होतो. तापमानवाढीचा परिणाम पशुधनाच्या शरीरावर होऊन उत्पादनात घट, आजारपण आणि मृत्यू देखील होऊ शकतो.त्यामुळे पशुपालकांनी योग्य खबरदारी घ्यावी असे आवाहन पशुसंवर्धन विभागाने केले आहे.

जेव्हा वातावरणातील तापमान नेहमीच्या सरासरीपेक्षा ३ अंश सेल्सिअस किंवा अधिक वाढून सलग ३ दिवस किंवा त्याहून अधिक काळ टिकते, तेव्हा त्या परिस्थितीस उष्णलहरी (Heatwave) असे म्हणतात. काही ठिकाणी 45AmoC किंवा अधिक तापमान सलग २ दिवस राहिल्यास उष्णलहरी घोषित केली जाते.

उष्णलहरींच्या परिणामामुळे पुढील समस्या निर्माण होतात. शरीरातील पाणी आणि क्षार कमी होणे, (डिहायड्रेशन), उष्माघात (Heat Stroke),तापमानामुळे चारा कमी खाणे आणि उत्पादनात घट होणे, श्र्वसन समस्या आणि त्वचेसंबंधी आजार, थकवा, स्नायू आखडणे आणि मृत्यूचा धोका संभवतो.

काही प्रकारच्या प्राण्यांना उष्णलहरीचा धोका जास्त असतो. यामध्ये लहान वासरे,करडे आणि गाभण जनावरे, गडद रंगाचे प्राणी (उन्हाचे शोषण अधिक होते), श्वासाच्या किंवा हृदयविकाराने ग्रस्त जनावरे, नुकतेच लोकर कापलेल्या मेंढ्या,दुभती जनावरे आणि मोठ्या शरीराची जनावरे,वराह (डुक्कर) आणि कुक्कुट पक्षी यांना उष्माघाताचा धोका जास्त संभवतो.

प्राण्याची सुस्ती आणि अनुत्साही वागणूक, शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होणे,लाळ गळणे आणि नाकपुड्या कोरड्या होणे, पाणी जास्त प्रमाणात पिणे,शरीराचे तापमान वाढणे ही लक्षात दिसून येतात.

प्रथमोपचार म्हणून पशुधनास सावलीत किंवा गारठलेल्या ठिकाणी ठेवावे.थंड पाणी प्यायला द्यावे. शरीरावर थंड पाण्याचा शिडकावा करावा. आवश्यक असल्यास पशुवैद्यकीय मदत घ्यावी.

त्वचेचे आजार (सूर्यदाह / सनबर्न) असल्यास त्याची लक्षणे पुढीलप्रमाणे दिसून येतात.त्वचा लालसर होणे.सुज आणि फोड येणे,ताप येणे हे दिसून येतात. प्रथमोपचार म्हणून अँटीसेप्टिक औषधांचा वापर करावा.प्राण्यावर पाण्याचा शिडकावा करावा.ताप असल्यास योग्य औषध द्यावे. स्नायू आखडणे (Cramps),



पाय आणि पोटाचे स्नायू आकुंचन पावणे. जनावराला हालचाल करण्यात त्रास होणे, घाम जास्त येणे ही लक्षणे दिसल्यास प्रथमोपचार म्हणून सावलीत किंवा थंड ठिकाणी विश्रांती द्यावी.स्नायूंना हळुवार मालिश करावे. इलेक्ट्रोलाइट मिश्रण पाजावे.

उष्माघातामुळे जास्त घाम येणे,अशक्तपणा आणि धाप लागणे,शरीराचे तापमान स्थिर पण सुस्ती जाणवणे ही लक्षणे दिसून येतात. प्रथमोपचार म्हणून गारठलेल्या ठिकाणी विश्रांती द्यावी.फॅन किंवा कुलरचा वापर करावा. थंड पाणी प्यायला द्यावे. एकाच ठिकाणी जास्त जनावरे एकत्र करू नयेत.

अशावेळी पशुधन व्यवस्थापनासाठी हवामानाचा अंदाज आणि तापमान यावर लक्ष ठेवावे.चारा आणि वैरण यांचा पुरेसा साठा करून ठेवावा.जनावरांना संतुलित आहार आणि क्षारयुक्त खाद्य द्यावे.सकाळी आणि संध्याकाळी चरावयास सोडावे. दुपारी उन्हात सोडू नये.पशुधनासाठी पाण्याचे टाकी किंवा स्वच्छ पाण्याचे हौद तयार करावेत.प्राण्यांना वारंवार थंड पाणी पाजावे आणि त्यांच्यावर पाणी शिंपडावे. गोठ्याचे छत थंड राहण्यासाठी त्यावर गवत किंवा झावळ्या टाकाव्यात. जनावरांना गारठलेल्या ठिकाणी ठेवण्यासाठी फॅन किंवा कुलर वापरावा. शेतीसाठी वापरणाऱ्या बैलांना दुपारी १२ ते ४ च्या दरम्यान विश्रांती द्यावी. पशुवैद्यकीय मदतीसाठी जवळच्या डॉक्टरांशी संपर्क साधावा.

उष्णलहरींच्या वेळी जनावरे उघड्यावर बांधू नयेत.प्राण्यांना उन्हात दूरवर पाण्यासाठी पाठवू नये.भर उन्हात शेतीसाठी बैलांचा वापर करू नये. पशुधनाची वाहतूक करणे शक्यतो टाळावे.एकाच ठिकाणी जास्त जनावरे बांधू नयेत. दुपारी किंवा उन्हाळ्यात दुभत्या जनावरांचे दुध काढू नये.मृत जनावरांची विल्हेवाट योग्य प्रकारे लावावी,उघड्यावर टाकू नये.प्रत्येक प्रकारच्या पशुधनासाठी विशेष काळजी घ्यावी.

कुक्कुटपक्ष्यांसाठी संरक्षण म्हणून पक्षीगृहाच्या छतावर चुना लावावा किंवा झावळ्यांचे आच्छादन करावे. तापमान कमी करण्यासाठी स्प्रिंकलर आणि फॉगर्स वापरावे. पक्ष्यांसाठी थंड पाणी आणि अन्न दुपारी १२ ते ४ दरम्यान टाळावे. अंडी उत्पादन टिकवण्यासाठी खाद्यात जीवनसत्त्वे आणि इलेक्ट्रोलाइट्स मिसळावेत.

मेंढी आणि शेळ्यांची काळजी घेतांना लोकर उन्हाळ्यापूर्वीच कातरावी. गडद रंगाच्या मेंढ्यांना अधिक सावधगिरी बाळगावी. स्थलांतर फक्त सकाळी किंवा संध्याकाळी करावे.सावलीसाठी तात्पुरते शेडनेट बसवावे.

उष्णलहरी आणि उष्माघातामुळे पशुधनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊ शकते. त्यामुळे वेळेवर प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक आहे.योग्य व्यवस्थापन,सावधगिरी आणि पशुवैद्यकीय मदतीने पशुधनाचे आरोग्य आणि उत्पादन दोन्ही टिकवता येते.तरी पशुपालकांनी आपल्या पशुधन व कुक्कुट पक्षांची उष्म लहरी व उष्माघातापासून काळजी घ्यावी. असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी,जिल्हा परिषद,धाराशिव यांनी केले आहे.

# पोलीस दलातील ८ अधिकारी आणि अंमलदार सेवानिवृत्त




### पोलीस अधीक्षकांच्या हस्ते शुभेच्छा देऊन निरोप

**आरंभ मराठी । धाराशिव**

पोलीस दलातील ८ अधिकारी अंमलदार नियत वयोमानानुसार दिनांक ३१ मार्च रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांना पोलीस अधीक्षक संजय जाधव यांच्या हस्ते शुभेच्छा देऊन पोलीस अधीक्षक कार्यालयात सन्मानाने निरोप देण्यात आला. हा निरोप समारंभ कार्यक्रम पोलीस अधीक्षक कार्यालय येथे महिना अखेरीस नियमीतपणे आयोजित केला जातो. यावेळी धाराशिव पोलीस दलातील पोलीस उप निरीक्षक- रब्बानी अब्दुल आरेफ जुनेदी, पोलीस उप निरीक्षक शंकर जगदाळे, महेबुब खान पठाण, सहाय्यक पोलीस फौजदार संदीपान साबळे, राजासाहेब फुलारी, पोलीस हावलदार तुकाराम खामकर, सोनटक्के, पोलीस अधीक्षक कार्यालयातील प्रमुख लिपीक राजाराम पवार या ८ व्यक्तींना सेवानिवृत्त झाल्याबद्दल निरोप देण्यात आला. निरोप समारंभादरम्यान पोलीस अधीक्षकांनी त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास सेवानिवृत्त अधिकारी, अंमलदार हे कुटूंबीयांसह उपस्थित होते. कार्यक्रमांचे सुत्रसंचालन सपोनि संतोष तिघोटे यांनी केले. तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन पोनि गणेश कानगुडे यांनी केले. यावेळी पोनि विनोद इज्ञपवार, पोनि चिंतले उपस्थित होते.

# तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयात स्टार्टअप्ससाठी भांडवल वाढवणे आणि वित्त व्यवस्थापन करणे विषयावर कार्यशाळा

**आरंभ मराठी । धाराशिव**




तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालय हे विद्यार्थ्यांची नामांकित कंपनीत प्लेसमेंट करण्यासाठी अग्रेसर आहेच, त्याचबरोबर विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता विकास व्हावा म्हणून सातत्याने प्रयत्न करत आहे. यामुळेच महाविद्यालयातील मागील पाच वर्षांमध्ये ५० पेक्षा अधिक माजी विद्यार्थ्यांनी उद्योग सुरू केले आहेत. त्याचबरोबर गतवर्षी महाविद्यालयाच्या दोन विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र युनिव्हर्सेशन चॅलेंज मध्ये आपल्या प्रकल्पाचे सादरीकरण करून प्रत्येकी एक लाख रुपये बीज भांडवल त्यांच्या प्रकल्पाचे रूपांतर स्टार्टअप मध्ये होण्यासाठी मिळवले आहे. अशाच प्रकारे विद्यार्थ्यांचा उद्योजकता विकास होऊन त्यांनी स्वतःचे स्टार्टअप सुरू व्हावे म्हणून, धाराशिव येथील तेरणा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट कॉलेज ऑफ इंजीनियरिंग मध्ये स्थापन झालेल्या संस्थेच्या इनोव्हेशन कौन्सिलने दिनांक २७ मार्च २०२५ रोजी स्टार्टअप्ससाठी भांडवल वाढवणे आणि वित्त व्यवस्थापन करणे या विषयावर एक दिवसाचे वर्कशॉप आयोजन केले होते. राजेंद्र कोरे फाउंडर अँड डायरेक्टर ऑफ क्रायसालिस आणि आयम्स क्रायसालिस इन्स्टिट्यूट ऑफ ट्रेनिंग अँड प्लेसमेंट याचे संस्थापक आणि संचालक , पुणे यांनी या विषयावर प्राध्यापक व विद्यार्थ्यांना उत्तम मार्गदर्शन केले. त्यांनी बोलताना असे सांगितले की , स्टार्टअप स्टार्टसाठी समस्या समाधानाच्या संकल्पना समजून घ्या, समस्या कशा ओळखायच्या आणि उपाय विकसित कसे करायचे ते कसे जाणून घेणे व आर्थिक स्केलेबिलिटी कशी मिळवावी यावर त्यांनी मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेमध्ये महाविद्यालयाच्या शंभरहून अधिक विद्यार्थ्यांनी उस्फुर्तने भाग घेतला. यावेळी प्राचार्य व इन्स्टिट्यूट इनोव्हेशन कौन्सिल चे अध्यक्ष डॉ.विक्रमसिंह माने यांनी महाविद्यालयाच्या काही यशस्वी स्टार्टअप सुरू केलेल्या माजी विद्यार्थ्यांचे उदाहरणे दिली व महाविद्यालयातील इच्छुक विद्यार्थ्यांना त्यांचे स्वतःचे स्टार्टअप सुरू करण्यासाठी महाविद्यालय व व्यवस्थापन निश्र्चितपणे आपल्या पाठीमागे उभे राहील याची ग्वाही दिली. यावेळी महाविद्यालयाचे इन्स्टिट्यूशन इनोव्हेशन कौन्सिलचे कन्व्हेनर प्रा.डॉ. सुशीलकुमार होळंबे , महाविद्यालयाचे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. अशोक जगताप सर्व विभाग प्रमुख, स्टुडन्ट कौन्सिलचे सर्व सदस्य यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी होण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

# नळदुर्गमध्ये रमजान ईद उत्साहात साजरी

### मुस्लिम बांधवांनी सुख, शांती आणि एकात्मतेसाठी केली प्रार्थना



**आरंभ मराठी । नळदुर्ग**

नळदुर्ग व परिसरात सोमवारी (दि.३१) ईद उल फितर मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी नळदुर्ग शहरातील इदगाह मैदानावर हजारो मुस्लिम बांधवांनी एकत्रित येऊन नमाज अदा केली. यावेळी सर्वप्रथम जामे निजामियाचे शेखूल हदीस अल्लामा मौलाना हाफेज व खारी सय्यद सगीर अहेमद जागीरदार यांनी रमजान च्या बाबतीत धार्मिक प्रवचन केले. त्यानंतर नळदुर्ग शहराचे शहर काझी हाफेज मोहम्मद अली मैनोदीन काजी यांनी खुदबा पठण केला. त्यानंतर धर्मगुरू हाफेज जागीरदार यांनी सुख, शांती, समृद्धी, बंधुभाव व एकात्मतेसाठी प्रार्थना केली. यावेळी राष्ट्रवादीचे प्रदेश कार्यकारणी सदस्य अशोक जगदाळे यांच्या वतीने मुस्लिम बांधवांचे पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्ष नितीन कासार, कमलाकर चव्हाण, शरीफ शेख, सरदार सिंग ठाकूर, रुकनोद्दीन शेख,नवल जाधव,दिपक काशिद, बलदेव ठाकूर अमित शेंडगे हे उपस्थित होते. यावेळी नळदुर्ग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सचिन यादव, सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकिशोर सोळूंके, आनंद कांगूने, पोलीस उपनिरीक्षक ईश्वर नांगरे, संतोष गीते, सपोनि विजय आटोळे बाळू दळवी, जीवीशाचे धनंजय वाघमारे, अमर जाधव यांच्यासह पोलिस प्रशासनातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता. त्याचबरोबर नळदुर्ग शहरातील जामा मस्जिद, ऐतिहासिक किल्लयातील शाही जामा मस्जिद, हमीद खॉ मस्जिद, मरकज मस्जिद येथे तसेच नळदुर्ग परिसरातील अणदूर, जळकोट, हंगरगा नळ, इटकळ, निलेगाव, काटगाव, केशेगाव, चिवरी उमरगा, वागदरी, शाहपूर, सलगरा दिवटी, लोहगाव, बोरगाव,सिंदगाव,नंदगाव याच्यासह नळदुर्ग पोलीस ठाण्याच्या हद्दीतील विविध गावात ईद-उल-फित्र ची नमाज अदा करण्यात आली. यावेळी हिंदू मुस्लिम बांधवांनी एकमेकांना शुभेच्छा देत एकात्मतेचा संदेश दिला.

# मंगरूळ येथे हिंदू मुस्लिम एकतेचा संदेश देत मारुती मंदिरात ईद साजरी



**आरंभ मराठी । मंगरूळ**

तुळजापूर तालुक्यातील मंगरूळ येथे ईद निमित्त हिंदू मुस्लिम एकतेचा संदेश देत मारुती मंदिरात ईद साजरी करण्यात आली. मुस्लीम बांधवांच्या पवित्र रमजान पर्वाची रविवारी सांगता झाल्याने, सोमवारी (दि.३१) सर्वत्र रमजान ईद साजरी केली गेली.रमजान ईद निमित्त गावातील मारुती मंदिर येथे रमजान ईद मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. गावातील मारुती मंदिरामध्ये हिंदू बांधवांकडून पवित्र रमजान महिन्याच्या ईद निमित्त हिंदू व मुस्लिम बांधवांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले. मंगरूळ येथे रमजान ईद हिंदू - मुस्लिम बांधवांकडून सर्व धर्म समभावाने मोठ्या उत्साहाने साजरी केली.

# मुरूम येथील यशवंत नगरमधील पाण्याच्या समस्येवर जागरण गोंधळ करत आंदोलन

### पंधरा दिवसात निराकरण न झाल्यास तीव्र आंदोलनाचा दिला इशारा

**आरंभ मराठी । मुरूम**

मुरुम शहरातील यशवंत नगर भागातील पिण्याच्या पाण्याच्या टाकीजवळील चार पाण्याचे वॉल खराब झाल्यामुळे नागरिकांना दूषित पाणी प्यावे लागत आहे. यापैकी एका वॉलजवळच गटार असल्याने गटारीतील पाणी पिण्याच्या पाण्यात मिसळत असून, त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. या परिस्थितीमुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. याशिवाय, या भागातील पाण्याच्या वॉलचे खड्डे नेमके रस्त्याशेजारी असल्याने ते मोठे झाले असून, त्याचा वाहनचालकांना मोठा त्रास होत आहे. दोन दिवसांपूर्वीच एक मोठा ट्रक या खड्ड्यात अडकला होता. स्थानिक नागरिकांनी एकत्र येऊन ट्रक बाजूला करण्याचे काम केले. नवीन व्यक्तींना या खड्ड्यांची माहिती नसल्यामुळे मोटरसायकलस्वार वारंवार अपघातग्रस्त होत आहेत. या अपुऱ्या रस्त्यामुळे भविष्यात मोठे अपघात होण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली. या समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी स्थानिक नागरिकांनी टाळ-मृदुंगाच्या साथीने जागरण गोंधळ आंदोलन केले. या आंदोलनाच्या माध्यमातून नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांना या गंभीर समस्येची जाणीव करून देण्यात आली. नागरिकांनी इशारा दिला की, पुढील १५ दिवसांत जर





दुरुस्तीचे काम सुरू झाले नाही, तर तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल. नगरपरिषद पदाधिकाऱ्यांनी आठ ते दहा दिवसांत दुरुस्तीच्या कामास सुरुवात केली जाईल, असे आश्र्वासन दिले आहे. या आंदोलनात स्थानिक नागरिकांसह भाजप युवा मोर्चा व भाजपचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी भाजपा युवा मोर्चा अध्यक्ष सिध्दलिंग हिरेमठ, किरण कुंभार, कल्लेश्र्वर मडोळे दत्ता बेंडकाळे, श्रीकांत थोरात, संकेत जाधव, पवन घोडके, विशाल भोसले, श्रीहरी जाधव, प्रशांत मडोळे व महिला वर्ग देखील आंदोलनात उपस्थित होते.

# खंडोबाच्या पवित्र भंडाऱ्याला भेसळीचे ग्रहण, भेसळ रोखण्याचे शासनाला साकडे

**आरंभ मराठी । पुरंदर**

धार्मिक, आध्यत्मिक आणि आयुर्वेद शास्त्रातील पवित्र्य सांभाळणारी खंडोबा देव प्रिय हरिद्रचूर्ण हळद भंडारा ही जेजुरी मंदिराची ओळख असून, त्याची विक्रीही विक्रमी प्रमाणात होत असते.अशा देवप्रिय आणि लोकप्रिय भंडाऱ्याला सध्या मात्र भेसळीचे ग्रहण लागले आहे. स्थानिक प्रशासन आणि श्री मार्तंड देवसंस्थानचे कोणतेही नियंत्रण न राहिल्याने देवसंस्थानचे माजी प्रमुख, विश्र्वस्त शिवराज झगडे आणि जेष्ठ पत्रकार प्रकाश फाळके यांनी थेट भविकांच्या वतीने शासनालाच साकडे घालत अन्न आणि भेसळ प्रशासन विभागीय मंत्री नरहरी झिरवाळ यांची भेट घेऊन भंडारा भेसळ मुक्त करण्याची विंनती केली





आहे.

हळद आणि कुंकू यामध्ये प्रचंड प्रमाणात भेसळ होत असल्याचे दिसून येत आहे. याबाबत भविक आणि स्थानिक नागरिकांच्या आरोग्य आणि श्रद्धा भक्तीशी खेळ होत असून, अनेक तक्रारीही येत आहेत. नित्यनियमाने गुरव पुजारी कोळीघडशी तसेच मानकरी ग्रामस्थांचे भंडाऱ्याशी संबंध येत असतोच. रोजच्या वापरामुळे नकली भंडाऱ्यामुळे त्वचारोग, घशाचे विकार, यांसारखे भयंकर प्रकार दिसू लागले आहेत. यात्रा काळात हजारो किलो नकली भंडारा उधळला जातो. याबाबत देवसंस्थान मौन धरून बसले असल्याचा आरोप शिवराज झगडे यांनी केला आहे. भंडारा हा धार्मिक दृष्ट्या महत्वपूर्ण असून प्राचीन पौराणिक काळापासून हरिद्रचूर्ण नावाने संबोधले जाते. पौराणिक काळापासून विजयाचे प्रतीक आणि आरोग्य रक्षक असलेला शुद्ध भंडारा उधळून देवाला साकडे घालण्याची पद्धत सुरु आहे. यात्रा-जत्रेसारख्या लोकउत्सवातील मंगल्याचे प्रतीक असलेला भंडारा मंदिराचा सांस्कृतिक चेहरा आहे. भेसळयुक्त भंडाऱ्यावर शासन आणि देवसंस्थान प्रशासनाला नियंत्रण ठेवण्यात अपयश कसे येते, हे न उलगडणारे कोडे आहे. याबाबत मंत्री झिरवाळ यांनी ठोस उपाययोजना आणि कडक कारवाई करण्याचे आश्वासन दिले असल्याचे प्रकाश फाळके आणि शिवराज झगडे यांनी सांगितले. आता देवाचा भंडारा शुद्ध होईल, अशी भविकांनी आशा व्यक्त करायला काहीच हरकत नाही.

# तारामती काकडे यांचे निधन

**आरंभ मराठी । धाराशिव**



येथील तारामती शहाजीराव काकडे यांचे वृद्धापकाळाने सोमवारी रात्री ८:१५ वाजेच्या सुमारास निधन झाले. त्या ७९ वर्षांच्या होत्या. मंगळवारी सकाळी कपिलधारा स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यविधीला विविध क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.त्यांच्या पश्चात नितीन काकडे व दयानंद काकडे ही दोन मुले, सुना व नातवंडे आहेत.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.-2023/90078

# बेसुमार उपसा आणि उष्णतेमुळे पाणीसाठ्यात घट

## शिराढोण परिसरातील विहीरी आणि कुपनलीकांमधील पाणीसाठा वेगाने घटतोय

## भविष्यात पाणीटंचाईच्या झळा तीव्र होणार ; पाणी जपून वापरण्याची गरज



अमोलसिंह चंदेल । आरंभ मराठी

**शिराढोण : प्रत्येक वर्षी असमतोलीत पावसाची परिस्थिती असते. यंदा समाधानकारक पाऊस झाला असला तरी देखील मोठे पाऊस झाल्याने ते पाणी वाहून गेले. यंदा पावसाचे पाणी जमिनीत मुरले नाही त्यामुळे शिराढोण परिसरातील जमीनीची यंदाही तहाण पुर्णपणे भागली नाही. यंदाच्या पावसाळ्यात झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या विहीरी, कुपनलीका व सार्वजनीक पाणी पुरवठ्यासाठी निर्माण केलेली जलस्त्रोते यांच्या पाणीसाठ्यात जी काही त्रोटक वाढ झाली होती, त्या पाणीसाठ्यातील साठा आज अखेर कमालीचा घटला आहे. त्यातूनच भविष्यातील पाणीटंचाईच्या तीव्र झळा जाणवणार असल्याची शक्यता आहे.**

यावर्षी धाराशिव जिल्ह्यात सर्वदूर सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाला हे खरे असले तरी पाण्याचा बेसुमार वापर आणि वाढत्या उष्णतेमुळे जलाशय आणि विहिरीतील पाणी झपाट्याने आटण्यास सुरुवात झाली आहे. त्यातच यावर्षी ऊस लागवड मोठ्या प्रमाणावर झाली असल्यामुळे पाणी उपसा देखील मोठ्या प्रमाणात होत आहे. परिणामी विहिरी, जलाशये हळूहळू रिकामी होत असल्याचे



चित्र दिसत आहे. झपाट्याने घटणाऱ्या पाणी पातळीमुळे येणाऱ्या काळात शिराढोण व परिसरास पाणी टंचाईस सामोरे जावे लागु शकते. दरवर्षी पडणाऱ्या पावसाचे पाणी जमीनीत मुरल्यामुळे मानवनिर्मीत पाणीसाठ्यात साठलेल्या पाण्यावरच शेतीची व पिण्याच्या पाण्याची गरज भागवली जाते. या पाण्यावरच परिसरातील शेतकरी पीकांची जोपासणा करून उत्पादन घेतात. शिराढोण व परिसरात गेल्या – चार वर्षापासून कधी ओल्या तर कधी कोरड्या दुष्काळी परिस्थीतीमुळे शेतकरी कर्जबाजारी झाले आहेत. यावर्षी पावसाळ्याच्या सुरवातीपासूनच मोठ्या पावसाची नोंद झाली, परंतु हे पाणी वाहून गेल्याने पावसाचे पाणी जमीनीत मुरण्याची प्रक्रीया मंदावली. परिणामी परिसरातील पाण्याची जमीनीतील पातळी कमालीची खालावली आहे. यंदाच्या पावसाळ्यातही जो काही पाऊस या परिसरात झाला त्याच्या माध्यमातून झालेल्या नैसर्गिक जलपुनर्भरणाच्या प्रक्रियेतून थोड्याफार प्रमाणात परिसरातील मानवनिर्मीत जलसाठ्यात पाणीसंचय झाला होता. झालेला हा पाणीसाठा गरजेच्या प्रमाणात अतिशय नगण्य स्वरूपाचा असून यात मोठ्या प्रमाणात घट झाली असून अनेकांच्या विहिरींनी तळ गाठला आहे. त्याचबरोबर कुपनलीकांमधील पाण्याचा ओघही घटला आहे.

### पाणीवापराबाबत नियोजनाची गरज



परिसरातील एकंदरीत परिस्थिती पाहता भविष्यात पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता असून, याचे परिणाम लक्षात घेता प्रशासकीय पातळीवरून शेतीच्या तसेच पिण्याच्या पाणी वापराबाबत योग्य ते नियोजन करण्याची गरज आहे. त्याचबरोबर प्रशासकीय व सामाजिक पातळीवरून परिसरातील जनतेत याबाबत जागृती करून पाण्याच्या काटकसरी वापराबाबत सर्वांना जाणीव करून देणे गरजेचे आहे.

### जलसंधारणाची कामे होणे गरजेचे

शिराढोण व परिसरात या वर्षी मोठ्या प्रमाणात जलसंधारणाची कामे होणे गरजेचे आहे. या भागात असणाऱ्या सर्व नाले व नद्यांचे खोलीकरणाचे रुंदीकरणाचे काम केल्यास मोठ्या पावसाचे पाणी जमिनीत मुरण्यासाठी मदत होणार आहे. या कामासाठी शेतकऱ्यांनी स्वतः पुढाकार घेणे आवश्यक आहे.

## विविध वृत्त...

### आर.पी.आय (आठवले) पक्षाच्यावतीने नुतन जिल्हाधिकारी पुजार यांचा सत्कार



आरंभ मराठी । धाराशिव

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले पक्षाच्या वतीने धाराशिव जिल्ह्याचे नूतन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांचा भारतीय संविधानाची प्रस्ताविका देऊन मंगळवारी (दि.१) सत्कार करण्यात आला. याप्रसंगी आरपीआयचे जिल्हाध्यक्ष विद्यानंद बनसोडे, जिल्हा कार्याध्यक्ष सोमनाथ गायकवाड, शहराध्यक्ष उदयराज बनसोडे, सामाजिक कार्यकर्ते प्रमोद हावळे, कांबळे वकील, तालुका कार्याध्यक्ष मुकेश मोटे व सामाजिक कार्यकर्ते संदीप अंकुशराव यांची उपस्थिती होती.

### सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेकडुन उद्या आमदार प्रविण स्वामी यांच्या सत्काराचे आयोजन

आरंभ मराठी । उमरगा



महाराष्ट्र राज्य सेवानिवृत्त शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी व अधिकारी संघटना, उमरगा शाखेची बैठक गुरुवार दि.३ एप्रिल २५ रोजी सकाळी १० वा. जि.प.प्रशाला सभागृह उमरगा येथे होणार आहे. यावेळी उमरगा पंचायत समिती अंतर्गत शिक्षण, आरोग्य, कृषी,महसुल विभागातील सेवानिवृत्त शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व अधिकारी यांच्या वतीने नुतन आमदार प्रविण स्वामी यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे. ही बैठक संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष देविदास बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हाध्यक्ष प्रदिप मोकासे, पदमाकर मोरे (चेअरमन,जि.प.हायस्कूल सोसायटी,उमरगा) प्रमुख अतिथी यांच्या उपस्थितीत आयोजित केली आहे.

या वेळी पेन्शनरांचे तालुका, जिल्हा व राज्य स्तरावरील प्रश्न सोडविण्याविषयी विचारविनिमय करण्यात येईल. तसेच उर्वरीत तालुका कार्यकारणी निवड,सभासद पावती बुकनुसार नोंदणी, नविन सभासद नोंदणी, सेवानिवृत्त शिक्षक आमदार प्रविण स्वामी व फेब्रु./मार्च २५ अखेर सेवानिवृत्तांचा सत्कार व आयत्या वेळचे विषय इ. विषयी चर्चा होणार आहे. या बैठकीला सर्वांनी उपस्थित राहावे असे आवाहन तालुकाध्यक्ष शाहुराज चव्हाण, सरचिटणीस अशोक स्वामी, दयानंद बेळंबकर, राजेंद्र पाटील, शोभा टोंपे–नागमोडे, प्रेमकला व्हंताळकर, कमलाकर मोटे व पदाधिकारी यांनी केले आहे.

### कोळेवाडी ते गाणगापूर पायी दिंडी प्रस्थान सोहळ्याचे शिवसेना उपनेते ज्ञानराज चौगुले यांच्या हस्ते पूजन



आरंभ मराठी । उमरगा

उमरगा तालुक्यातील मौजे.कोळेवाडी येथुन प्रतिवर्षाप्रमाणे श्री.क्षेत्र गाणगापुर देवस्थानकडे पायी दिंडी सोहळ्याचे मंगळवार दि.१ एप्रिल रोजी कोळेवाडी ता.उमरगा येथून प्रस्थान झाले. याप्रसंगी शिवसेना उपनेते तथा उमरगा लोहारा तालुक्याचे मा.आमदार ज्ञानराज चौगुले यांच्या शुभहस्ते पूजन व आरती करण्यात आली. चौगुले यांनी यावेळी दिंडीतील सर्व वारकऱ्यांना पुढील प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रम प्रसंगी शिवसेना तालुकाप्रमुख बळीराम सुरवसे, ज्ञानेश्र्वर पालमपल्ले मा.सरपंच, ह.भ.प.बळीराम महाराज इरले, ह.भ.प.उद्धव महाराज पालमपल्ले, व्यंकट गव्हाळे, इंद्रजीत गलांडे, राजू करनुरे, बालाजी करनुरे, नरसिंग लंजारे, सिद्राम पालमपल्ले, यशपाल कांबळे, विठ्ठल पालमपल्ले आदी भक्तगण व कोळेवाडी ग्रामस्थ उपस्थित होते.

### भारतीय किसान संघाच्यावतीने आमदार राणा पाटील यांचा सत्कार



आरंभ मराठी । धाराशिव

महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन' 'मित्र' या राज्याच्या आर्थिक व धोरणात्मक दिशा ठरविणाऱ्या महत्वपूर्ण संस्थेच्या उपाध्यक्षपदी आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांची निवड झाल्याबद्दल भारतीय किसान संघ जिल्हा धाराशिवच्या वतीने आमदार राणा पाटील यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी भारतीय किसान संघ धाराशिवचे जिल्हाध्यक्ष नितीन घुले (वाशी), भारतीय किसान संघ तालुका अध्यक्ष लोहारा काशिनाथ लकडे, विवेकानंद बिराजदार जेवळी लोहारा, भूपाल गायकवाड तुळजापूर, राहुल जाधव, संतोष कांबळे भूम, महादेव काजळे, महादेव जाधव, बालाजी लोंढे कोंड तालुका धाराशिव , सिद्धराम तांबडे, श्रीकांत बिराजदार लोहारा, रणवीर घुले वाशी उपस्थित होते.

## समाज प्रबोधनकार सत्यपाल महाराज यांचे प्रबोधनात्मक कीर्तन

### विद्यार्थी आणि गावकऱ्यांचा केला सन्मान



आरंभ मराठी । शिराढोण

कळंब तालुक्यातील शिराढोण येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती, महात्मा फुले जयंती, डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती व सर्वज्ञ प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने जयंती निमित्त समाज प्रबोधनकार सत्यपाल महाराज यांचा कार्यक्रम शुक्रवारी (दि.२८) पार पडला. या वेळी सरपंच लक्ष्मीताई म्हेत्रे, डॉ. शैलेंद्र चव्हाण, रेणुका डुंबरे, वैशालीताई लोंढे यादव, शिवलीला कानडे, स्वेताताई लोंढे, मा जि.प. सदस्य शहाजी पाटील यांची उपस्थिती होती. प्रबोधन करताना सत्यपाल महाराज यांनी वृक्ष लागवड, अनावश्यक खर्च, सर्वधर्म समभाव आदी विषयावर प्रबोधन केले. या वेळी किरण पाटील, पत्रकार रणजित गवळी, निलेश नाईकवाडे, सतीश शिंपले, चंद्रकांत महाजन, नासेर पठाण, वरून पाटील, अमोल नाईकवाडे, विक्रम नाईकवाडे, अनिल गायसमुद्रे, ताजखा पठाण, ग्रामपंचायत सदस्य ज्योती महाजन, बेबी नंदा गोरे, अंजली गायकवाड, ज्योती नाईकवाडे, कोमल नाईकवाडे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन चंद्रकांत महाजन व निलेश नाईकवाडे यांनी केले.

यावेळी नवोदयसाठी पात्र झालेले गावातील विद्यार्थी प्राची कैलास खडबडे, सानवी महादेव समुद्रे, श्रावणी दयानंद राऊत, पंकजा पंढरी जाधवर, अभिषेक चंद्रशेखर कुलकर्णी, तेजस्विनी किरण राऊत व मार्गदर्शक शिक्षक रमेश व्होके, रमेशकुमार काकडे यांचा सन्मान करण्यात आला.

### या गावकऱ्यांचा झाला सन्मान

यावेळी बिभीषण पवार, विठ्ठल खडबडे, रवी नाईकवाडे, पांडुरंग कोळी, मंजूर दखनी, प्रतीक संगवे, खंडू वाघमारे, अभिजित पाटील, असिफ खैरात शेख, चक्रधर यादव, ज्योती महाजन, उषा दुगाने, दत्ता पवार, स्नेहल साळुंके यांचाही या कार्यक्रमात सन्मान करण्यात आला.

## भूम येथील 'प्राईड'मध्ये युकेजी विद्यार्थ्यांचा स्वयंशासन दिन साजरा

आरंभ मराठी । भूम



भूम येथील प्राईड इंग्लिश स्कूलमध्ये स्वयंशासन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. अमान कुरेशी हा मुख्याध्यापक तर राजनंदिनी हिवरे हिने उपमुख्याध्यापक म्हणून शालेय कामकाज आणि एक दिवसीय प्रशासन चालवले. प्राईड इंग्लिश स्कूल च्या युकेजी वर्गाच्या विद्यार्थ्यांच्या वतीने स्वयंशासन दिनाचे आयोजन केले होते.

विद्यार्थ्यांचा स्वयंशासन दिनातील सहभाग हा केवळ शिक्षक होण्याचा अनुभव देणारा नसून, भविष्याला आकार देणारी रूची, कला दर्शविणारे एक प्रतीक असते. प्राचार्य, शिक्षक, लिपीक, सेवक व विद्यार्थी यांच्या तांत्रिक सुसंवादाची जाणीव निर्माण होते. स्वयंशासन हा एकदिवसीय अनुभव अन् आनंद वाढवणारा असतो. तसेच भविष्यात यशाची दिशादर्शक ठरतो म्हणून विद्यार्थी ही आठवण आयुष्यभर जपतो. यावेळी कृष्णा बागडे हा पर्यवेक्षक बनला होता. तर इतर विद्यार्थ्यांनी शिक्षक म्हणून कार्य पार पाडले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मेघा सुपेकर, दिपीका टकले, भाग्यश्री डांगे यांच्यासह आशा म्हेत्रे व अरुणा बोत्रे यांनी परिश्रम घेतले.

## सेवानिवृत्त अंकुश नाडे यांचा विक्रम काळे यांच्या हस्ते सत्कार

आरंभ मराठी । मुरुड




मुरुड येथील रहिवाशी तथा जवळगा पोमादेवी ता. औसा येथील विद्यानिकेतन कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राध्यापक अंकुश नाडे यांचा सेवानिवृत्त झाल्याबद्दल मराठवाडा शिक्षक आमदार विक्रम काळे यांनी सत्कार केला . विद्यार्थी प्रिय शिक्षक म्हणून त्यांची ओळख असल्याने महाविद्यालयामधेही त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला . प्रा. नाडे यांच्या कार्याची दखल घेऊन लातूर जिल्हा रौप्य महोत्सवानिमित रौप्य महोत्सव समितीने त्यांना आदर्श शिक्षक पुरस्कार देवून सन्मानित केले होते.

## भूम शहरात उद्या तालुकास्तरीय बालकुमार मराठी साहित्य संमेलन

आरंभ मराठी । भूम

भूम येथील जिल्हा परिषद शाळेत प्रथमच गुढी पाडव्याच्या निमित्ताने बालकुमार मराठी साहित्य संमेलन प्रारंभिक स्वरूपात तालुका स्तरावर आयोजित केले आहे. या संमेलनात अधिकाधिक बालकुमार साहित्यिकांनी सहभाग घ्यावा असे आवाहन संस्थेचे तालुका कार्यवाहक नवकवी शंकर खामकर यांनी केले आहे.

गुरुवारी (दि.३) भूम येथील जिल्हा परिषद हायस्कूलमध्ये प्रथमच अखिल भारतीय बालकुमार मराठी साहित्य संस्थेच्या पुढाकाराने ज्येष्ठ साहित्यिक कवयित्री प्रा. अलका सपकाळ यांच्या मार्गदर्शनाखाली व जनसेवा ग्रामीण विकास संस्था उळूप तालुका भूम या संस्थेच्या सहकार्याने तालुकास्तरीय बालकुमार मराठी साहित्य संमेलन आयोजित केले आहे. या संमेलनात सहभागी होणाऱ्या बालकवींना सन्मानपत्र तसेच प्राधान्य क्रमाने प्रथम तिघांना सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात येणार आहे. यावेळी जिल्हा परिषद हायस्कूल भूमचे आदर्श मुख्याध्यापक तात्या कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली व साहित्यिक प्रा.अलका सपकाळ यांच्या मार्गदर्शनाखाली होत असलेल्या तालुकास्तरीय बालकुमार मराठी साहित्य संमेलनासाठी अहिल्यानगर, जामखेड, कळंब, वाशी,परंडा येथील ज्येष्ठ बाल साहित्यिक, बाल साहित्य लिहिणारे ज्येष्ठ साहित्यिक यांचं बालकुमार साहित्यिकांना मार्गदर्शन होणार आहे.या संमेलनासाठी मार्गदर्शन म्हणून धर्मदत अरुण अण्णा शाळू महाराज, ज्येष्ठ साहित्यिक आश्रुबा कोठावळे कळंब , ॲड. विलास पवार तसेच प्रमुख उपस्थित म्हणून कवित्री सौ संध्याराणी कोल्हे कळंब, सौ गायत्री दिनेश तिवारी परंडा, एम आय मुजावर जेष्ठ साहित्यिक वाशी व सौ आशा राऊत कवयित्री कळंब यांची उपस्थिती राहणार आहे. या संमेलनासाठी जिल्ह्याचे नेतृत्व करणाऱ्या ज्येष्ठ साहित्यिक प्रा. अलका सपकाळ, नवकवी शंकर खामकर यांच्या बरोबरच आलिम शेख , प्रा. डॉ. राजश्री तावरे, दस्तगीर पठाण , अंबादास देशपांडे, सर्जेराव इंधनकर, ह भ प अरुण काळे महाराज, श्रीमती अंजली सुतार, हरिदास पंडित, माजी सैनिक हेमंत देशमुख व दत्तात्रय काळे हे प्रयत्नशील आहेत. बालकुमार मराठी साहित्य संमेलन आणि शाखेचा उद्घाटन सोहळा अखिल भारतीय मराठी बालकुमार शाखा भूम व जनसेवा ग्रामीण विकास संस्था उळूप यांच्या संयुक्त विद्यमाने संपन्न होत आहे. तरी तालुक्यातील साहित्यप्रेमी, वाचक यांनी उपस्थित रहावे असे आवाहन शाखेच्या समन्वयक प्रा.अलका सपकाळ व नवकवी शंकर खामकर यांनी केले आहे.

# नागरिकांचा सहभाग घेत गाळ काढण्याची मोहीम, पाणंद रस्ते, शेतरस्त्याची कामे जलदगतीने पूर्ण करा

### 'मित्र'चे उपाध्यक्ष, आमदार राणा पाटील यांचे जिल्हा प्रशासनाला निर्देश


आरंभ मराठी । धाराशिव

जिल्ह्यातील शेतकऱ्यांना बारमाही वहिवाटीसाठी शेतरस्ते आणि पाणंद रस्ते उपलब्ध करून देणे अत्यावश्यक आहे. तसेच पावसाळ्यापूर्वी जलसाठ्यातील गाळ काढून अस्तित्वातील पाणीसाठ्यात वाढ करण्याच्या दृष्टीनेही युद्ध पातळीवर प्रक्रिया राबविणे आवश्यक आहे. त्यासाठी ही सगळी कामे १५ एप्रिलपासून सर्व यंत्रणांनी नागरिकांचा सक्रिय सहभाग घेत मिशन मोडवर पूर्ण करण्याचे निर्देश 'मित्र' चे उपाध्यक्ष आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी महसूल,कृषी आणि ग्रामविकास खात्यासह जिल्हा प्रशासनाला दिले आहेत.

जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी यांच्यासह धाराशिव, तुळजापूर आणि कळंबचे तहसीलदार व गटविकास अधिकारी या महसूल आणि ग्रामविकास विभागातील अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेत पावसाळा सुरू होण्यापूर्वी तातडीने ही कामे हाती घेण्याबाबत आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी जिल्हा प्रशासनाला निर्देश दिले आहेत. ही कामे सुरू असतानाच पहिल्या टप्प्यात धाराशिव, तुळजापूर व कळंब तालुक्यातील रस्ते निश्चित करण्यात आले आहेत. त्यानंतर टप्प्याटप्प्याने इतर सर्व तालुक्यातही अशीच प्रक्रिया राबविण्यात आली आहे. ज्या रस्त्यावरील सर्व शेतकऱ्यांच्या संमती मिळतील व माती कामासाठी मशीनरीसाठी आवश्यक इंधनापुरता लोकवाटा जमा होईल, त्या ठिकाणी तातडीने कामे सुरू करण्यात येतील. सेवाभावी संस्था व दानशूर व्यक्तींच्या माध्यमातूनही माती कामासाठी मशिनरी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तर शेतकऱ्यांनी इंधनापुरता लोकवाटा जमा करावयचा आहे. त्यानंतर रस्त्याचे मजबुतीकरण शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून करण्यात येणार असल्याचेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी नमूद केले आहे.

### १५ दिवसाला आढावा घेणार

या विषयावर आपले काम एक महिन्यापासून काम सुरू असून दर १५ दिवसाला याचा आढावा घेण्यात येणार आहे.त्यानुसार जिल्ह्यातील प्रत्येक गावात काम करण्याच्या सूचना आपण जिल्हा प्रशासनाला दिलेल्या आहेत,असे आमदार पाटील यांनी सांगितले आहे.



जिल्ह्यात पाझर तलाव, साठवण तलाव, कोल्हापुरी पद्धतीचे बंधारे, लघु व मध्य प्रकल्प असे १२०० हुन अधिक जलसाठे अस्तित्वात आहेत. या सर्व प्रकल्पात आजघडीला साचलेला गाळ काढल्यास जलसाठ्यात मोठी वाढ अपेक्षित आहे. त्यामुळे शेतीसाठी मोठया प्रमाणात पाणी उपलब्ध होऊ शकते. जलसाठ्यातील गाळ काढण्यासाठी ४२ कोटी रुपये इतका निधी उपलब्ध झाला आहे. त्याव्यतिरिक्त सीएसआर निधीच्या माध्यमातूनही आवश्यकतेनुसार आणखीन निधी उपलब्ध करून देण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत.

# आढावा बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांनी दोन्ही विभागांना घेतले फैलावर



- जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घेतला यात्रेच्या प्रशासकीय तयारीचा आढावा
- येडेश्वरी देवीची यात्रा दहा दिवसांवर आली असताना महावितरण आणि बांधकाम विभागाच्या कामांना गती येईना

आरंभ मराठी/येरमाळा

**येरमाळा येथील प्रसिद्ध आराध्य दैवत श्री येडेश्वरी देवीची चैत्र पोर्णिमा यात्रा अवघ्या दहा दिवसांवर आली असून, यात्रेच्या प्रशासकीय नियोजन बैठकीत यात्रेच्या अनुषंगाने झालेल्या चर्चेतील विषयावर आधारित आढावा बैठक जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या अध्यक्षतेखाली येडेश्वरी मंदिर कार्यालयात पार पडली. यामध्ये संबंधीत विभागांच्या तुलनेत यात्रे संदर्भात तयारीत महावितरण आणि बांधकाम विभागा कडून दिरंगाई होत असल्याने या दोन विभागांना चांगलेच फैलावर घेत यात्रेगोदर कामे पुर्ण करा असे सुचित केले.**



मंगळवारी (ता.१) येडेश्वरी देवी चैत्रयात्रा आढावा बैठकीसाठी जिल्हाधिकारी किर्ती किरण पूजार, जि.प.मुख्य कार्यकारी डॉ. मैनाक घोष,पोलीस अधिक्षक संजय जाधव, अप्पर पोलीस अधिक्षक शफकत आमना, उपविभागीय अधिकारी संजय पाटील, तहसीलदार हेमंत ढोकळे, पोलिस उपविभागीय अधिकारी संजय पवार, गटविकास अधिकारी आर.व्ही. चकोर,पोउनि पवन निंबाळकर,सरपंच सौ.प्रिया बारकुल,माजी सरपंच विकास बारकुल,उपसरपंच गणेश बारकुल, देवीचे मानकरी अमोल पाटील, यशवंत पाटील, देवस्थानचे उपाध्यक्ष संजय आगलावे, ग्रामस्थ, पुजारी, यांच्यासह यात्रा संबधित अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

श्री येडेश्वरी देवीच्या चैत्र पोर्णिमा यात्रेबाबत १० दिवसापूर्वी यात्रा नियोजन बैठकीच्या अनुषंगाने यात्रा काळात केल्या जाणाऱ्या तयारी संदर्भात आरोग्य,पाणीपुरवठा,जि.प. बांधकाम,विभागाने तयारीची माहिती दिली.ग्रामपंचायतकडुन मुबलक पाणी पुरवठा व शुद्ध पाणी पुरवठा करण्यात येणार असून यात्रा प्रशासनाला पुर्णपणे सहकार्य करण्यात येणार आहे.तसेच मंदिर ट्रस्टने मंदिर परिसरात,आमराई परिसरात सी.सी. टिव्ही कॅमेऱ्यांची तसेच पिण्याच्या




पाण्याची सोय,पोलिस बंदोबस्ताच्या जोडीला खाजगी कंपनीच्या सुरक्षा रक्षक तुकडी नेमल्याचे सांगितले. पोलिस प्रशासनाकडून बंदोबस्तकामी कर्मचारी अधिकाऱ्यांची व्यवस्था केली असुन दोन कन्ट्रोल पॉंइंट केले असुन या ठिकाणाहुन महावितरण, ग्रामपंचायत, आरोग्य विभाग ग्रामपंचायत प्रशासन आदी विभागाशी संपर्कामध्ये असणार आहेत शिवाय यात्रेला येणार्या भाविकांच्या सोयी सुविधेसाठी सर्वांनी सहकार्य करुन सुचना कराव्यात पोलिस प्रशासनाकडुन योग्य सुचनेच पालन केले जाईल व उपाय योजना केल्या जातील तसेच येणार्या वाहनांच्या पार्कीगची चोख व्यवस्था करण्यात येणार असुन वाहतुक कोंडी टाळण्यासाठी विशेष काळजी घेतली जाणार आहे असे पोलीस अधिक्षक संजय जाधव यांनी सांगितले.

एसटी महामंडळाच्या वतीने यात्रा काळात गावाच्या चारी बाजूला यात्रा शेड उभारण्यात येणार असून भाविकांना पिण्याच्या पाण्यासाठी,निवाऱ्यासाठी व्यवस्था करण्यात येणार असल्याचे राज्य परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

### हरवलेल्या व्यक्तींसाठी बूथ स्थापन करण्याची सूचना

जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी यात्रा काळात लहान मुलं, वयस्कर भाविक हरवतात. त्यामुळे यात्रेत हरवले – सापडले विभाग स्थापून वेगवेगळ्या ठिकाणी दोन किंवा तीन बूथ स्थापन करावे अशी सूचना त्यांनी केली. श्री येडेश्वरी देवस्थानला प्रशासकीय स्तरारावर यात्रेच्या अनुषंगाने विकासात्मक उंचीवर नेण्यासाठी आपण कायम प्रयत्नशील राहू असेही त्यांनी यावेळी सांगितले.

### फिरत्या स्वच्छतागृहाचा होणार वापर

जिल्हा परिषदेचे सिईओ डॉ. मैनाक घोष यांनी यात्राकाळात भाविकांच्या सुरक्षेसह स्वच्छतेसाठी फिरते स्वच्छतागृहाची कांही सोय करता येईल का हे पाहण्यास सांगितले. याच्या खर्चासाठी भाविकांकडून माफक दरात यात्रा कर घेता येईल असेही ते म्हणाले.

### गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी सीसीटीव्हीचा वापर

जिल्हा पोलीस अधीक्षक संजय जाधव यांनी यावेळी बोलताना संपूर्ण यात्रा परिसरात सीसीटीव्ही लावण्यात येणार असल्याचे सांगितले. भाविकांना सोईसुविधा, वाहतूक कोंडीचा सामना करावा लागणार नाही अशी व्यवस्था करण्यात आल्याचे सांगुन प्रत्येक ग्रामस्थ,भाविक यांनी यात्रा आपली आहे असे सहकार्य करावे असे अवाहन त्यांनी केले.

### पालखीमार्गाचे काम तात्काळ करावे

यावेळी चर्चेत यात्रा काळात महत्वाची अडचण असलेला येडेश्वरी मंदिर पालखी रस्ता खुप महत्त्वाचा असुन रस्ता पुर्ण झाला आहे. मात्र या रस्त्यावरील रस्त्याच्या दोन्ही बाजूनी पाच ते सात फुट खोल खड्डे असल्याने यात्रा काळामध्ये पालखी येताना भावीक खड्ड्यात पडून जखमी होण्याची शक्यता नाकरता येत नाही. त्यामुळे बांधकाम विभागाने नवीन पालखीमार्गाच्या साईडपट्ट्या भरुन घ्यावा असे सांगण्यात आले.

## एमटीएस परीक्षेत यशवंतराव चव्हाण विद्यालयाचे दणदणीत यश

आरंभ मराठी । धाराशिव

येथील यशवंतराव चव्हाण प्राथमिक, माध्य व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी एम.टी.एस. ऑलीम्पियाड स्पर्धा परीक्षेत घवघवीत यश मिळवले आहे.

धाराशिव येथील यशवंतराव चव्हाण प्राथमिक, माध्य व उच्च माध्य विद्यालयातील विद्यार्थ्यांनी ५ जानेवारी २०२५ रोजी घेण्यात आलेल्या एम. टी. एस. ऑलीम्पियाड स्पर्धा परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून यामध्ये विद्यालयातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळविले आहे.

या परीक्षेत विद्यालयातील विश्वदीप आडसकर, येसुराज्ञी कामटे, आरोही राऊत, रुद्रप्रताप कामटे, अवंतिका पाटील, आयुष्य सदाफुले या सहा विद्यार्थ्यांनी जिल्ह्यात पहिल्या दहामध्ये येण्याचा बहुमान पटकावला आहे तर चौदा विध्यार्थ्यानी गोल्ड मेडल, अठरा विद्यार्थ्यांनी सिलव्हर मेडल व वीस विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक डॉ. रविकांत शितोळे, स्पर्धा परीक्षा विभाग प्रमुख, स्पर्धा परीक्षेतील सर्व शिक्षक, शाळेतील सर्व शिक्षक वृद यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



## धाराशिव जिल्हा विधीज्ञ मंडळाच्या नूतन कार्यकारणीचा पदग्रहण सोहळा थाटात



आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव जिल्हा विधीज्ञ मंडळाच्या नूतन कार्यकारणीचा पदग्रहण सोहळा जिल्हा न्यायालयातील सभागृहात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी जिल्हा विधिज्ञ मंडळाचे माजी अध्यक्ष ॲड. प्रसाद जोशी यांनी ॲड. अमोल वरुडकर यांच्याकडे नूतन जिल्हा विधीज्ञ मंडळाचा अध्यक्षपदाचा पदभार सोपविला असून, जिल्हा विधिज्ञ मंडळाच्या नूतन अध्यक्षपदाचा पदभार ॲड. अमोल वरुडकर यांनी स्वीकारला. यासोबतच उपाध्यक्ष म्हणून ॲड. नितीन लोमटे व ॲड. प्रमोद वाकुरे, तर कोषाध्यक्षपदी ॲड.एन. डी. पाटील, सचिवपदी ॲड. अनिकेत देशमुख, सहसचिवपदी ॲड. भाग्यश्री रणखांब व महिला प्रतिनिधी म्हणून ॲड. उज्वला इंगळे यांनी पदभार स्वीकारला आहे. याप्रसंगी नूतन कार्यकारणीचा जिल्हा विधिज्ञ मंडळाचे माजी अध्यक्ष ॲड. प्रसाद जोशी व कार्यकारिणीच्या वतीने सत्कार करण्यात आला तसेच महाराष्ट्र गोवा बार असोसिएशनचे माजी सदस्य ॲड. मिलिंद पाटील यांनीही यावेळी नूतन कार्यकारणीचा सत्कार केला व शुभेच्छा दिल्या. या पदग्रहण समारंभास जिल्ह्यातील वकील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कसगी येथील कुस्तीपटुचा शिवसेना उपनेते ज्ञानराज चौगुले यांच्या हस्ते चांदीचे कडे देऊन सत्कार

आरंभ मराठी । उमरगा

उमरगा तालुक्यातील कसगी येथील पै.मुंतजीर सरनौबत या युवकाने यंदा धाराशिव, अहिल्यानगर व कर्जत जामखेड या तिन्ही ठिकाणी झालेल्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत ८६ किलो वजनी गटातुन विजय संपादन करीत सुवर्णपदक मिळवले आहे. यापूर्वी हरियाणा येथे झालेल्या कुस्ती स्पर्धेत युवा गटातुनही त्याने विजय मिळवला होता. त्यावेळी त्याचा सत्कार करण्यासाठी उपस्थित असलेले उमरगा लोहारा तालुक्याचे माजी आमदार तथा शिवसेना उपनेते ज्ञानराज चौगुले यांनी या पैलवानाला पुढील स्पर्धा जिंकल्यानंतर आपल्याकडुन चांदीचे कडे भेट देण्याचे जाहीर केले होते. या अनुषंगाने मंगळवारी (दि.१) मा.आमदार ज्ञानराज चौगुले यांनी कसगी गावामध्ये जाऊन पै./मुंतजीर सरनौबत याचा यथोचीत सत्कार करून त्यांना चांदीचे कडे भेट दिले. यावेळी कसगी ग्रामस्थांच्या वतीनेही या कुस्तीपटुचा सत्कार करण्यात आला. आपल्या भागातील खेळाडुंनी राज्य पातळीवर विजय मिळवणे ही नक्कीच अभिमानाची गोष्ट आहे. अशा खेळाडुंना प्रोत्साहन देणे हे आपले कर्तव्य असल्याचे मत यावेळी बोलताना मा.आ.चौगुले यांनी व्यक्त केले. युवा सेना विभागीय निरीक्षक किरण गायकवाड यांनीही यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी शिवसेना तालुकाप्रमुख बळीराम सुरवसे, विधानसभा अध्यक्ष शरद पवार, सरपंच हणमंत गुरव, व्यंकट पाटील, शिवा म्हात्रे, दिलीप बदोले, गोविंद महाराज, शारदाबाई आलगुडे, दत्ता भोसले, संजय नंदर्गे, संदीप चौगुले, बलवीर राजपुत, नबीसाब मुल्ला, जमीर मुल्ला आदी ग्रामस्थ व कुस्तीप्रेमी नागरिक यावेळी उपस्थित होते.




## गोविंदपूर येथील जिल्हा परिषद केंद्रिय प्राथामिक शाळेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार

आरंभ मराठी । गोविंदपूर

कळंब तालुक्यातील गोविंदपूर येथील जिल्हा परिषद केंद्रिय प्राथमिक शाळेत इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांना फेटा बांधून, एक साखरेचा हार व पुष्प गुच्छ देवून त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सरपंच अशोक मस्के, शाळेचे मुख्याध्यापक कनकवाड, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष सौ.वृंदावनी विष्णू मुंडे, कबन मुंडे, विष्णू मुंडे, विश्र्वास केंगार, बालाजी सुरवसे, माजी सैनिक मनोज मुंडे, भगवान घबाडे, समाधान माळी, राहुल मुंडे, हिंमत मुंडे, अतुल पाटील, धनंजय माळी, ज्योतिराम कोकाटे, संजय बिडवे, रामकिसन भांगे, कृष्णा मेणकुदळे, तसेच शिक्षक दत्तात्रय दिवटे, श्रीमती जयश्री पाटील, देशमाने बालासाहेब, श्रीमती कालिंदा मुंडे, श्रीमती होवाळ विद्या, श्रीमती नागटिळक आशाबाई, श्रीमती जमाले रोहिणी, संतोष ढोणे, राहूल माळी व पालक मोठ्या संख्याने उपस्थित होते.

## मुरुम महावितरण कार्यालयावर शेतकऱ्यांचा धडक मोर्चा

**वीज पुरवठा सातत्याने खंडित होत असल्याने शेतकरी आक्रमक**



आरंभ मराठी । मुरूम

मुरुम शहरातील संतप्त शेतकऱ्यांनी मंगळवारी (ता.१) सकाळी महावितरणच्या कार्यालयावर धडक मोर्चा काढला. वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांनी महावितरणच्या मनमानी कारभाराविरोधात तीव्र संताप व्यक्त करत कनिष्ठ अभियंत्याला घेराव घातला. नियमित व सुरळीत वीजपुरवठा करण्याची मागणी करत, या समस्येवर तातडीने उपाययोजना न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला. मुरुम शहर तसेच परिसर शिवारातील ब्याळे फिडर, भोसगे फिडर आणि गडीशिवार फिडरमध्ये वारंवार वीजपुरवठा खंडित होत आहे. वीजपुरवठा सुरू झाल्यास तो कमी दाबाने मिळत असल्याने शेतीसाठी विद्युत मोटारी वापरणे कठीण झाले आहे. परिणामी, पिकांना वेळेवर पाणी देता येत नाही, तसेच जनावरांसाठी पाणी मिळवणेही अडचणीचे ठरत आहे. महावितरणकडून वेळेवर आणि योग्य दाबाने वीजपुरवठा होत नसल्याने शेतकऱ्यांनी रोष व्यक्त केला. शेतकऱ्यांनी याबाबत मागणी करताना सांगितले की, शेतीसाठी नियमित आणि योग्य दाबाने वीजपुरवठा आवश्यक आहे. याशिवाय, खराब झालेले ट्रान्सफॉर्मर त्वरित बदलणे, आवश्यक ठिकाणी नवीन ट्रान्सफॉर्मर बसवणे आणि वीजवाटपाच्या व्यवस्थेत सुधारणा करणे या मागण्याही शेतकऱ्यांनी केल्या. वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे शेतीसह घरगुती वीजपुरवठ्यावरही मोठा परिणाम होत आहे, असे शेतकऱ्यांनी सांगितले.

शेतकरी संघटनांच्या नेतृत्वाखाली या मोर्चात मोठ्या संख्येने शेतकऱ्यांनी सहभाग घेतला. महावितरणच्या कार्यशैलीवर तीव्र नाराजी व्यक्त करत, वीजपुरवठा नियमित केला नाही तर आणखी तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा शेतकऱ्यांनी दिला. प्रशासनाने त्वरित उपाययोजना करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी या मोर्चातून करण्यात आली. शेतकऱ्यांनी सांगितले की, जर वीजपुरवठा सुरळीत न झाल्यास आणि मागण्या मान्य न झाल्यास पुढील टप्प्यात रस्तारोको, उपोषण आणि महावितरणच्या कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्याची तयारी करण्यात येईल. त्यामुळे प्रशासनाने या गंभीर समस्येकडे त्वरित लक्ष देऊन उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

### तीन वर्षांपासून प्रस्ताव रखडलेला

या संदर्भात महावितरणचे कनिष्ठ अभियंता सचिन वाघमारे यांनी सांगितले की, उमरगा येथील मुख्य केंद्रातून कमी दाबाने वीजपुरवठा होत आहे. वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी तसेच वाढीव वीजपुरवठ्यासाठी वरिष्ठ स्तरावर अहवाल पाठवले आहेत. मात्र, हा प्रस्ताव मागील तीन वर्षांपासून प्रलंबित असल्याने वीजपुरवठ्याच्या समस्या कायम आहेत. या प्रस्तावाला वरिष्ठ पातळीवरून मान्यता मिळाल्यास समस्या दूर होण्याची शक्यता आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## प्रशासनाची टीम क्रिकेटच्या मैदानावर, सामाजिक सलोखा चषक स्पर्धेचे उद्घाटन



आरंभ मराठी । धाराशिव

प्रशासनाच्या विविध विभागासाठी सामाजिक सलोखा चषक क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली असून, या स्पर्धेचे उद्घाटन शिवसेनेचे जिल्हा संघटक सुधीर पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. शहरातील के.टी. पाटील क्रीडा संकुल येथे या सामाजिक सलोखा चषक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेचे उद्घाटन मंगळवारी सकाळी सुधीर पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी धनंजय शिंगाडे, सचिन शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. सदरील सामने शहर पोलीस, डॉक्टर, जिल्हा परिषद विभाग, वाहतूक पोलीस, आनंद नगर पोलीस, नळदुर्ग पोलीस, भूम पोलीस, परांडा पोलीस, पाठबंधारे विभाग, पॉलिटेक्निक विभाग, कोर्ट महसूल विभाग आणि एस टी महामंडळ आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ यांच्यात होत आहेत. त्यानिमित्ताने सर्वच प्रशासन खेळाच्या मैदानावर दिसत होते